अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

सोनेतारण कर्ज प्रति तोळा: 85000 12% वार्षिक व्याजदर दाम दुप्पट ठेव वर्ष 06 100 दिवसाच्या ठेवीवर 10%

व्यावसायिक कर्ज सोनेतारण कर्ज | सरकारी नोकरदार कर्ज योजना | दूध समृद्धी कर्ज, ५ लाखापर्यंत मॉर्गेज लोन

संस्थापक, चेअरमन: मा.श्री. अनिलभाऊ इंगवले

एल के पी मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि.सोलापूर

शाखा : निर्मिती लँडमार्क, इंदिरानगर विजापूर रोड सोलापूर मो : 7218622002

शाखा : कृष्णा हाइट्स, ब्रम्हदेवदादा माने बँकेच्या वर पहिला मजला, आसरा चौक, सोलापूर मो.7204552002

www.surajyadigital.com । सोमवार, दि. १ सप्टेंबर २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३३३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## सोलापूरच्या लोधी गल्लीतील थरार...

# गॅस गळतीने गुदमरून भाऊ-बहीण बालकांचा अंत

# साखर झोपेतील एकाच कुटुंबातील ५ जण बेशुद्ध



मृत्यू पावलेल्या हर्ष आणि अक्षरा यांचा एक आनंदातील प्रसंग.

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर शहराच्या लष्कर भागातील लोधी गल्लीत नळबझार चौक बालाजी मंदिर रविवारी थरार घडला. एकाच कुटुंबातील ५ जण बेशुद्धावस्थेत सापडले. दुपार होवूनही घराचा दरवाजा उघडला नव्हता. त्यामुळे परिसरातील लोकांनी घरावरचे पत्रे उचकटून टाकले. तेव्हा हे सर्वजण घरात बेशुद्ध पडलेले होते.त्यांना तातडीने शासकीय रूग्णालयात दाखल केले. रविवारी रात्री त्या घरातील सहा वर्षाचा बालक आणि चार वर्षाची बालिका या भाऊ-बहिणीचा शासकीय रूग्णालयात मृत्यू झाल्याने लष्कर भागात शोककळा पसरली. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर शनिवारी रात्री झोपल्यानंतर शेगडीमधून गॅसची बारिक गळती झाली होती. साखर झोपेतील या कुटुंबातील लोकांना काहीच कळले नाही. गॅस पोटात गेल्याने हे सर्वजण बेशुद्ध पडल्याचे तपासात निष्पन्न झाले.गॅस पोटात गेल्याने गुदमरून भाऊ-बहिणीचा अंत झाल्याचे सांगण्यात आले. या बेशुद्धावस्थेतील सासू आणि सून यांचीही प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.**

> “शनिवारी रात्रीपासून ते दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत गॅस खोलीत पसरत राहिला. हा गॅस बाहेर पडण्यासाठी कोणतेही खिडकी खोलीला नसल्याने हा विषारी वायू झोपलेल्या सदस्यांच्या अंगामध्ये भिनला. नेमक्या याच कारणामुळे चिमुकल्या हर्ष आणि अक्षरा यांचा उपचारादरम्यान रविवारी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला.
>
> – **नामदेव बंडगर**, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदर बाझार पोलीस ठाणे.



सोलापूर : प्रसंगी उघडीकीस आल्यानंतर बलरामवाले कुंटुबियाचे नातेवाईक व लोधी समाज बांधव शासकीय रूग्णालयात थांबले होते.

▸▸ सासू आणि सून अत्यवस्थ

▸▸ नागरिकांनी सतर्कता दाखवून साऱ्यांना बाहेर काढले

विमल मोहनसिंग बलरामवाले (वय ५२) त्यांची सून रंजनाबाई युवराज बलरामवाले (वय ३५), मुलगा युवराज मोहनसिंग बलरामवाले (वय ४०), हर्ष बलरामवाले (नातू) वय ६ वर्षे आणि अक्षरा बलरामवाले (नात) वय ४ वर्षे (सर्व रा.बेडरपूल लोधी गल्ली) अशी बेशुद्ध आढळलेल्या रुग्णांची नावे आहेत. रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्यांना बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यातील हर्ष आणि अक्षरा यांचा रविवारी रात्री उपचार सुरू असताना मृत्यू झाला. गॅस पोटात गेल्याने गुदमरून त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

शनिवारी रात्री साधारणपणे अकरा वाजण्याच्या सुमारास बलराम परिवारातील सर्व सदस्य जेवण करून झोपी गेले असता, स्वयंपाक गृहातील गॅस मंद आचेवर नकळत सुरूच राहिल्याने गॅस ५ बाय १० आकाराच्या छोट्याशा रूममध्ये पसरत गेला. हा गॅस झोपलेल्या बलरामवाले परिवारातील सदस्यांच्या छातीमध्ये आणि फुफ्फुसामध्ये शिरल्याने सर्व सदस्य बेशुद्ध अवस्थेत आढळून आले.

दरम्यान, दुसऱ्या दिवशी रविवारी दुपारी एक वाजले तरीही आपल्या शेजारी का उठत नाहीत. हे पाहण्यासाठी शेजारील तसेच इतर नातेवाईकांनी बलरामवाले यांचा दरवाजा ठोठावला. परंतु आतम धून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. नातेवाईकांनी तसेच शेजाऱ्यांनी रूमवरील पत्रावर चढून पत्रा उचकटून पाहिले असता त्या छोट्याशा खोलीतून रात्रभर सुरू राहिलेल्या गॅस बाहेर आला. दोरीच्या सहाय्याने शेजाऱ्यांनी त्या खोलीत प्रवेश करून बाहेरचा दरवाजा उघडला. तेव्हा सर्व सदस्यांच्या तोंडाला फेस आल्याचे दिसून आले. घटनेचे गंभीर लक्षात घेता प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी तात्काळ बलरामवाले परिवाराला पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.



सोलापूर : बलरामवाले कुंटुबियाचे घराची पोलिसांनी पाहणी केली.

घडलेली घटना समजताच सदर बाझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्यासह इतर अधिकारी आणि पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत उपस्थित नातेवाईकांना धीर दिला. तसेच घडलेल्या घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा सुरू केला. यावेळी प्रत्यक्षदर्शी आणि नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार खोलीत स्वयंपाकगृहाचा गॅस सर्वत्र पसरल्याने ही घटना घडली असल्याची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी त्या अनुषंगाने तपास सुरू केला आहे.

बेशुद्ध अवस्थेत असलेले युवराज बलरामवाले हे गवंडी काम करीत असून त्यांची आई विमल आणि पत्नी रंजनाबाई या दोघी मजुरीने विडी तयार करतात. घटनेची माहिती मिळाल्यानंतर लष्कर आणि बेडरपूल परिसरातील लोधी समाजाच्या नागरिकांनी शासकीय रुग्णालयात गर्दी केली होती. हा प्रकार समजल्यानंतर सदर बझारच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी बलरामवाले यांच्या घराला भेट देऊन पाहणी केली.

## शावळमधील तरूण शेतकऱ्याचा ओढ्यातील पाण्यात बुडून मृत्यू

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी



मृत योगेश (बाळू) माने

शावळ (ता. अक्कलकोट) येथील एक ३५ वर्षीय युवा शेतकरी हेब्बाळ ओढ्यात वाहून गेल्याने त्यातच त्याचा मृत्यू झाला. योगेश (बाळू) भास्कर माने (वय ३५) असे मयत तरुणाचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी ४ वाजता शेताला जाताना तो कोल्हापूर पाटबंधाऱ्यावरून पाय घसरून पाण्यात पडला होता.

बचाव पथकाच्या मदतीने व गावकऱ्यांकडून शोध कार्य सुरू होते. रविवारी २४ तासांनी संध्याकाळी पाच वाजता वाहून गेलेल्या शेतकऱ्याचा मृतदेह मिळाल्याची माहिती प्रशासनाने दिली. मयत योगेश हा शेती काम करत होता. शावळ गावातून शनिवारी चालत शेतीकडे जात असताना हा प्रकार घडला. हेब्बाळ ओढ्याला खूप पाणी आले आहे. तिथून बचाव पथकाने गावकऱ्यांच्या मदतीने रविवारी दुपारी त्याचा मृतदेह शोधून बाहेर काढला. दरम्यान, रविवारी सकाळी माजी उपसभापती राम अरवत, दुपारी आमदार सचिन कल्याणशेट्टी, तहसीलदार स्मिता पाटील, उबाठाचे आनंद बुक्कानवरे व नायब तहसीलदारांनी घटना स्थळी भेट दिली. प्रशासनाचा शोध कार्यासाठी सहकार्य झाले नसल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला. योगेशचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अक्कलकोट ग्रामीण रूग्णालयात प्रेत आणण्यात आला. यावेळी शावळचे सरपंच नितीन चव्हाण यांनी देखील भेट देऊन सहकार्य केले. मयत योगेश माने याच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा असा परिवार आहे. रविवार संध्याकाळी त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## परळी वैजनाथ हादरले

# पंढरीच्या चिमुकलीवर अत्याचार करून अज्ञात नराधम पळाले

### ● पोटासाठी प्रवासाला निघालेल्या त्या मुलीसह आई-वडीलांवर ओढवले संकट

✔ **बीड** : राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीचं प्रमाण वाढले आहे. हत्या, अत्याचार आणि मारहाण अशा प्रकारचे गुन्हे सतत वाढताना दिसत आहे. याचदरम्यान, बीडमध्ये एक संतापजनक घटना समोर आली आहे. बीडमधील परळी वैजनाथ रेल्वेस्थानकावर पंढरपूरहून कामाच्या शोधात आलेल्या एका चिमुकलीवर अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेनं जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चिमुकली आणि तिचे कुटुंबीय रेल्वेस्थानकावर पंढरपूरहून गाडीने प्रवास करून आले होते. तिथे ते काहीवेळ विश्रांतीसाठी थांबले होते. दरम्यान, चिमुकलीचे आई-वडील कामाच्या शोधात असल्याचे समोर आले आहे.

### रेल्वे पोलीस फक्त नावालाच का?

परळी रेल्वे स्थानकावरील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे पोलीस असून या ठिकाणी आलेल्या प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर असते. मात्र ही घटना दिवसाढवळ्या घडली आहे. यामुळे रेल्वे पोलीस फक्त नावालाच आहेत का? असा सवाल यावेळी नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. यावरून जिल्ह्यात महिला सुरक्षित आहेत का? असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. पोलिस प्रशासन अशा नराधमावर काय कारवाई करणार आणि कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी काय उपाय योजना करणार आता हे पाहणे आवश्यक आहे.



चिमुकली जेव्हा मोठ्याने रडत होती, तेव्हा परिसरात उपस्थित असलेल्या प्रवाशांना तिच्या रडण्याचा आवाज आला. प्रवासी आवाजाच्या दिशेने गेले असता त्यांना हा प्रकार समोर आला. यावेळी त्या चिमुकलीचा रक्तस्त्राव होत होता, असे उपस्थित लोकांनी सांगितले आहे. या घटनेची तात्काळ माहिती संबंधित पोलिसांना देताच यावेळी घटनास्थळी परळी येथील संभाजीनगर पोलीस ठाण्याचे कर्मचारी येऊन त्या चिमुकलीला घेऊन परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी दाखल केले आहेत.

या चिमुकलीचे आई-वडील देखील परिसरात आराम करत होते, असे रेल्वे स्थानकावरील नागरिकांनी सांगितले. त्या पिडीत चिमुकलीच्या आई वडिलांना देखील या घटनेची माहिती नसल्याचे सांगण्यात आले. संभाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी या घटनेचा तपास करत आहेत.

## मराठा आरक्षणाची कोंडी फुटणार?

## जरांगे पाटलांनीच सुचवला नवा उपाय

✔ **मुंबई** : राज्य सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांची चर्चा फिस्कटल्याने मराठा आरक्षणाची कोंडी कायम आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांचे उपोषणही सुरुच आहे. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठी सांगितलेल्या कायदेशीर अडचणींमुळे हा प्रश्न सुटणार कसा? काय मार्ग निघणार? आणखी किती वेळ लागणार? असे सवाल उपस्थित केले जात आहेत.


अशात मराठा आरक्षणाची कोंडी फोडण्यासाठी स्वतः मनोज जरांगे पाटील यांनीच नवा उपाय सुचवला आहे. जर सरसकट या शब्दामुळे जर कोर्टात अडचण येत असेल तर सरसकट हा शब्द वगळून जीआर काढा. २०१२ च्या कायद्यानुसार मराठा-कुणबी पोटजात दाखवा. ५८ लाख नोंदीचा आधार घेऊन जीआर काढा, ज्याला घ्यायचं असेल ते घेईल. ज्याला घ्यायचं नसेल ते घेणार नाही, असा सल्ला मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीस सरकारला दिला आहे.

हैदराबाद आणि सातारा गॅझेटवर नि. न्या. संदीप शिंदे यांच्या समितीने १३ महिने अभ्यास केला आहे. हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातील मराठा समाज कुणबी आहे.

हा अहवाल स्वीकारा, तो राज्य मागासवर्ग आयोगाकडे द्या किंवा आधी मागासवर्ग आयोगाकडे द्या आणि मग तुम्ही स्वीकारा आणि कॅबिनेटमध्ये मान्यता द्या. शिंदे समितीचा अहवाल स्वीकारल्यास तुम्हाला कोणीही अडवू शकत नाही, असेही मत जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. मंत्रिमंडळ उपसमितीची जवळपास ५० मिनिटे बैठक झाली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, चेन स्नेचिंग ड्डड..
घोर कलियुग ड्डड!

# ही तर राजकीय आरक्षणासाठी धडपड

# चंद्रकांतदादांनी जरांगेंना लगावला टोला

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

राज्याचे उच्च-शिक्षण मंत्री तथा भाजप नेते चंद्रकांतदादा पाटील यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्यावर आरोप केला. मराठा समाजाचे सर्व प्रश्न सोडविण्यात आले आहेत. मात्र, केवळ राजकीय आरक्षण मिळावे, यासाठीच जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरू केल्याचा ठपका त्यांनी ठेवला.





पाटील हे रविवारी पंढरपूरच्या दौऱ्यावर आले होते.एक कार्यक्रम आटोपून झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.त्यावेळी जरांगेंच्या भूमिकेवर टीका केली. राजकीय आरक्षणासाठीच म नोज जरांगे पाटील यांचे मुंबईत आंदोलनाची धडपड सुरू आहे, असा आरोप चंद्रकांतदादांनी केला आहे. तसेच, मराठा सम ाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार नसल्याचेही पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

ते म्हणाले, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळणार नाही. पण, जरांगे पाटील हे सर्वसामान्य मुंबईकरांना वेठीस धरत आहेत. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळणार नाही.

मराठा समाजाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसीबीसी आणि ईडब्ल्यूएसमधून आरक्षण दिले होते. पण, जरांगे पाटील यांना ते मान्य नव्हते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये त्यांना केवळ राजकीय आरक्षण हवे आहे. त्यामुळेच त्यांनी हे आंदोलन सुरू केले आहे, असा दावाही चंद्रकांतदादांनी केला.

ते म्हणाले, फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर मराठा समाजातील जवळपास ५८ लाख कुणबी नोंदी शोधून त्यांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. मराठा समाजाचे सर्व प्रश्न सोडविण्यात आले आहेत. मात्र, केवळ राजकीय आरक्षण मिळावे, यासाठीच जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरू केले आहे.

फडणवीस हे एवढ्यात मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार नाहीत. त्यांच्याशी सरकारचे शिष्टमंडळच चर्चा करणार आहे.

चर्चेतून मार्ग निघणार असेल तरच चर्चा करणे योग्य होईल. फडणवीस यांनी सर्व समाजाचा विचार केला आहे. मराठा समाजाचा त्यांनी कधीच तिरस्कार केलेला नाही. मराठा समाजासाठी जे काही करता येईल, ते आतापर्यंत फडणवीस यांनी केलेले आहे, असेही पाटील यांनी नमूद केले.

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईकरांना वेठीस धरू नये, त्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी लोकशाही म ार्गाने आंदोलन करावे, असे आवाहनही पाटील यांनी जरांगे पाटील यांना केले आहे.

### चंद्रकांत दादांची सारवासारव

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नाही, अशी भूमिका उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पंढरपुरात बोलताना केली होती. त्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी चंद्रकांतदादांवर टीका केली होती. खरपूस शब्दांत समाचार घेतला होता. त्यानंतर सायंकाळी सोलापुरात बोलताना चंद्रकांत पाटील यांनी मनोज जरांगे पाटील हे माझे चांगले मित्र आहेत. त्यांच्यात आणि माझ्यात भांडणे लावू नका, अशी भूमिका घेतली आहे. मराठा समाजातील नेत्यांना माझी विनंती आहे, भांडण लावून काही होणार नाही. मुख्यमंत्र्यांनी आझाद मैदानावर पाच हजार लोकांना परवानगी दिली होती. आझाद मैदानापेक्षा बाहेर लोकांची जास्त गर्दी दिसत आहे. पहिल्या दिवशी नियोजनाचा गोंधळ झाला. आता महापालिकेने उत्तम व्यवस्था केली आहे, असेही पाटील यांनी नमूद केले आहे.